# बृहन्मुंबई महानगरपालिका

बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो. रा. वैद्यकिय महाविदयालय

डॉ.ए.एल नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८

## परिचर्या व प्रसविका अभ्यासक्रमा करीता जाहिरात

दिनांक 01.08.2017 पासून खालील बृहन्मुंबई महानगरपालिका संस्थे मध्ये सुरु होणा-या परिचारीका व प्रसविका अभ्यासक्रम प्रशिक्षण घेऊ इच्छिणा-या महिला उमेदवारांकडून विहीत प्रपत्रांमध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

1. रा.ए.स्मा.रुग्णालय, परेल, मुंबई - 400 012
2. लो.टि.म.स.रुग्णालय, मुंबई - 400 022
3. बा.य.ल.नायरधर्मारुग्णालय, मुंबईसेंट्रल, मुंबई - 400 008
4. डॉ.आर.एन.कूपररुग्णालय, विलेपार्ले, मुंबई - 400 049
5. श्रीहरिलालभगवतीरुग्णालय, बोरीवली(पश्चिम), मुंबई - 400 103

निवड झालेल्या उमेदवारांना सर्वसाधारण परिचारीका व प्रसविका अभ्यासक्रम प्रशिक्षण सोबत सामुहिक (कम्युनिटी) आरोग्य परिचारीका आणि प्रसुतीशास्त्र आंतरवासियतासहीत 3 वर्षे (कालावधी व अभ्यासक्रम भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र परिचर्या परिषद यांच्याठरावासापेक्ष) परिचारीका व प्रसविका अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घ्यावे लागेल.

स्त्री उमेदवारांनी रुग्णालयांशी संलग्न असलेल्या निवासस्थाना मध्ये रहाणे अनिवार्य आहे.

**विद्यावेतन-** दरमहा रु.100-10-130 अधिक रु.340/- गणवेश भत्ता अधिक रु.150/- धुलाई भत्ता अधिक मोफत वसतीगृह निवासस्थान व मोफत जेवण.

**अर्हता:-**

1. उमेदवार महाराष्ट्र राज्य उच्चमाध्यमिक शालांत परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा(10+2) अथवा महाराष्ट्रराज्या मधील मान्यता प्राप्त संस्थेची समतुल्य परीक्षा प्राधान्याने शास्त्रविषयासह (पी.सी.बी.) कमीतकमी 40 टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच मागास वर्गीय गटातील उमेदवारांच्या बाबतीत सदर परीक्षा किमान 35 टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

   वरीलप्रमाणे आवश्यक पात्रता धारण करणारे उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध झाले नाहीत तर महाराष्ट्र राज्य उच्चमाध्यमिक परीक्षा मंडळाची कोणत्याही शाखेतील आणि कोणत्याही विषयातील उच्चमाध्यमिक परीक्षा (10+2) कमीतकमी 40 टक्के गुणांनी उत्तीर्ण होणा-या खुल्या व मागासवर्गीय गटातील कमीतकमी 35 टक्के गुणांनी उत्तीर्ण होणा-या उमेदवारांचा प्रवेशासाठी विचार करण्यात येईल.
2. या अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेल्या जागांतून सहाय्यकारी परिचर्या प्रसविका अभ्यासक्रम (ANM) उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांसाठी 5 टक्के जागाराखी व असतील मात्र असे उमेदवार आवश्यक अर्हता (10+2) धारण करीत असावे तवया अभ्यासक्रमा बाबतच्या अन्य अटींची पूर्तता करीत असावेत. तथापि विहीत केलेल्या प्रपत्रात प्रतिज्ञापत्र सादर करण्यासापेक्ष जे

उमेदवार कोठेही नोकरीत नसतील त्यांना विद्यावेतन अनुज्ञेय राहील. या जागांकरीता जर असे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर जागा उर्वरित जागांत मिळविण्यात येतील.

3. अपंगांसाठी 3 टक्के जागा आरक्षित राहतील असे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील उमेदवारां मधून भरण्यात येतील.
4. उमेदवार 10वी व 12वी इयत्ता परीक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळ, उच्चमाध्यमिक अथवा समतुल्य शिक्षण मंडळातून उत्तीर्ण झालेली असली पाहिजे.
5. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम उच्चपरीक्षा किमान 50 गुणांचा मराठी विषय घेऊन (उच्चस्तर/ निम्नस्तर) उत्तीर्ण झालेली असली पाहिजे. मराठी भाषा सुलभतेने लिहिता, वाचता व बोलता आली पाहिजे.
6. पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

**वयो मर्यादा:-**

दिनांक 31.12.2017 रोजी 17 ते 35 वर्ष उमेदवारांचा जन्म दिनांक, दिनांक 01.01.1983 पासून दिनांक 31.12.2000 पर्यंत असल्यास प्रवेशासपात्र समजले जाईल.

**समुपदेशन:-**

समुपदेश्नासाठी निवड झालेल्या उमेदवारांना स्वखर्चाने हजर रहावे लागेल. समुपदेश्न करीता पात्र उमेदवारांची यादी व तारखा परिचर्या पाठयशाळा, बा.य.ल.नायर धर्मा. रूग्णालय येथे टाकण्यात येईल. समुपदेश्नासाठी हजर राहण्याकरीता उमेदवारांना स्वतंत्ररित्या पत्र पाठविली जाणार नाहीत. समुपदेश्न बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८, परिचर्या शाळा येथे घेण्यात येईल.

**सेवेच्या अटी:-**

निवड झालेल्या उमेदवारांना महानगरपालिका कर्मचा-यांची वर्तणूक व शिस्त विषयक नियम व विद्यार्थी परिचारीकांसाठी घालून दिलेले नियम व अधिनियम यांचे बंधन राहील. उमेदवारांना एकदा प्रवेश घेतल्यानंतर मध्येच अभ्यासक्रम सोडून जाता येणार नाही. अन्यथा रु.5500/- दंड आकारण्यात येईल.

अ) विद्यार्थी परिचारीका प्रवेशासाठी एकूण संख्या 350

ब) शासननियमा प्रमाणे सामाजिक आरक्षण खालील प्रमाणे आहे:-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | खुला प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण | 13% | 7% | 3% | 2.5% | 3.5% | 2% | 2% | 19% | 48% |

शासन निर्देशानुसार 1) जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र 2) उन्नत व प्रगत गटात न मोडत असल्याचे (नॉन- क्रिमीलेअर) प्रमाणपत्र विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती(क), भटक्या जमाती(ड), विशेष मागास वर्ग प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग प्रवर्ग या मागास प्रवर्गास लागू राहील व या प्रवर्गात येणा-या उमेदवारांची ते उन्नत व प्रगत व्यक्ती गटात मोडत नाही तया संबंधीचे आवश्यक ते सक्षम प्राधिकरणाने दिलेले विहीत प्रमाणपत्र २०१७-२०१८ या कालावधीसाठी अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे.

विजा(अ), भज(ब), भज(क) वभज(ड) या प्रवर्गासाठी विहीत केलेले आरक्षण हे अंतर्गत परिवर्तनीय राहील. जर मागास वर्गीयांच्या कोणत्याही प्रवर्गातील राखीव जागा रिक्त राहिल्यास त्या उर्वरित मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्ते नुसार भरण्यात येतील.

विहीत अर्जाचे नमुने रोख विभाग, बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय मुंबई सेंट्रल, मुंबई ४००००८ यांच्या कार्यालयात प्रगतवर्गासाठी रु.330/- +6% व्हॅटकर किंवा GST (वस्तू व सेवा कर) आणि मागासवर्गीयां साठी रु.220/- +6% व्हॅटकर किंवा GST (वस्तू व सेवा कर) जे लागु ठरतील ते प्रत्येकी भरल्यानंतर कोणत्याही कामाच्या दिवशी (दुस-या व चौथा शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवस सोडून) दररोज सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत दिनांक ०१.०७.२०१७ ते १२.०७.२०१७ पर्यंत वितरित करण्यात येतील. कोरे अर्ज टपालाने पाठविले जाणार नाहीत.

विहित नमुन्यातील पूर्ण भरलेला अर्ज पारपत्र (पासपोर्ट) आकाराचे नवीनतम छायाचित्र, प्रमाणपत्र व सक्षम प्राधिका-याकडून विहित नमुन्यात प्राप्त केलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत असलेली तपासणी यादीप्रमाणे परिचारीका शाळा, बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय, मुंबई सेंट्रल,मुंबई ४००००८ यांच्या कार्यालयात दिनांक १२.०७.२०१७ या दिवशी संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत स्वत: किंवा टपालाद्वारे पाठवावेत. विहित तारखेनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

विहित नमुन्यात नसलेले, अपूर्ण तसेच विहित तारखेपर्यंत प्राप्त न झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

<u>विशेष नोंद:-</u> महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या नियमानुसार सदर पदविका अभ्यासक्रम
प्रशिक्षण कालावधी तसेच अभ्यासक्रमातील विषय बदलण्याची शक्यता आहे याची नोंद घ्यावी.

-सही-
अधिष्ठाता
बा. य. ल. नायर धर्मा रुग्णालय
मुंबई . ४००००८